सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र. ०२५३-२३१५०८०/२३१७१५१ E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.०२५३- २५८१७००

**वाचा :** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. करोना २०२० /प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

४. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष/कोरोना विषाणू/१०४/ २०२० नाशिक दिनांक १४/०३/२०२०

५ .या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष/कोरोना विषाणू/१०७/ २०२० नाशिक दिनांक १६/०३/२०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/११४/२०२०**
**नाशिक दिनांक :-१७/०३/२०२०**

**<u>आदेश</u>**

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिद्धी केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्या अनुषंगाणे जिल्ह्यामध्ये नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जिल्ह्यात सामाजिक, राजकीय , धार्मिक, क्रीडाविषयक कार्यक्रमांना पुढील आदेश होईपर्यंत परवानगी देण्यात येवू नये तसेच यापूर्वी देण्यात आली असल्यास ती परवानगी रद्द करण्याचे संदर्भ ४ अन्वये आदेशित करण्यात आले होते.

त्या अर्थी करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्यामध्ये सर्व यात्रा व गर्दीचे उत्सव नाशिक जिल्ह्यामध्ये कोरोना या विषाणूची लागण झालेल्या राज्याचे इतर भागातून आणि इतर देशातून अनेक नागरिक या जिल्ह्यात प्रवास करून येत आहेत यामुळे योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. विशेषतः लग्न समारंभ अथवा तत्सम स्वरूपाच्या अन्य समारंभ यासाठी राज्याच्या अथवा देशाच्या वेगवेगळ्या भागातून नागरिक उपस्थित राहत असतात. त्या सर्वांची पूर्व तपासणी करणे सर्वतः अशक्य असल्याने मंगल कार्यालय, लॉन्स , मॅरेज हॉल, तसेच विवाह स्थळावर होणारी गर्दी टाळणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाचे संदर्भीय २ अन्वये विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **मी सुरज मांढरे**, **जिल्हाधिकारी,नाशिक जिल्ह्यातील मंगल कार्यालय, लॉन्स, हॉटेल्समधील अथवा अन्य वास्तुमधील मॅरेजहॉल, तसेच विवाह स्थळावर होणारी गर्दी टाळणेसाठी अशी अशा सर्व ठिकाणांचा वापर दिनांक** 19 **मार्च** 2020 **पासून दिनांक** 31 **मार्च** 2020 **पर्यंत गर्दी होईल अशा कोणत्याही कार्यक्रमांसाठी पूर्णतः बंद करण्याचा आदेश पारित करीत आहे**.

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता १८६० (४५) याच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**(सूरज दि मांढरे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रती -** १. मा. पोलीस आयुक्त , नाशिक शहर यांना पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह.

२. मा महापालिका आयुक्त म. न. पा. नाशिक यांना पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह.

३. पोलीस अधीक्षक , ग्रामीण पोलीस , नाशिक यांना पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह.

४ उपविभागीय दंडाधिकारी ( सर्व) ---------------------------नाशिक यांना पुढील कार्यवाहीसाठी.

५. तहसीलदार ( सर्व ) -------------------- नाशिक यांना पुढील कार्यवाहीसाठी.

**प्रत-.** १. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर